रे.दि.मु. १३५/२०२४

निशाणी ४७

वादी कडून साक्षीदार क्र.२ चा सरतपास

नाव – चंद्रशेखर पाडूरंग राऊत व.व. ३८

व्यवसाय – महानगर पालिका शाळा नं. १० या ठिकाणी प्रभारी मुख्याध्यापक रा.सांगली ता. मिरज जि. सांगली

वादी कडून साक्षीदार क्र. २ यांचा सरतपास विधीज्ञ आर. बी. मजले वकील यांचेकडून शपथेवर सुरु

१. प्रस्तूत कामाचे साक्षीसमन्स मला मिळाले आहे. मी आज रोजी साक्षीसाठी येताना सोबत जनरल रजिस्टर बुक क्र. ६ आणले आहे. सदरच्या रजिस्टर बुक मध्ये सन १९४६ ते १९६३ या सालादरम्यानच्या विद्यार्थ्यांच्या नोंदी आहेत. सदरच्या रजिस्टर मध्ये विद्यार्थ्यांच्या शाळा प्रवेशाची नोंदणी केली जाते. सदरच्या रजिस्टर मध्ये विद्यार्थ्याचे नाव, जात–पोट जात, शाळेत नांव दाखल केल्याची तारीख, जन्म तारीख, जन्म स्थान आणि शाळा सोडल्याची तारीख याच्या नोंदणी केल्या जातात. सदरच्या रजिस्टर मध्ये शेवटचे रजिस्टर नंबर ३५१ या नंबर बाळाबाई विष्णू कांबळे यांची नोंद आहे. सदरच्या रजिस्टर प्रमाणे बाळाबाई कांबळे यांची जात हिंदू–महार, जन्म ठिकाण मिरज, जन्म तारीख ०१.०१.१९४६, शाळेत नाव दाखल केल्याची तारीख ३०.०८.१९५२ इयत्ता १ ली ब आणि शाळा सोडलेची तारीख दिनांक ०८.१२.१९५३ इयत्ता १ ली अशी नोदविलेली आहे . तसेच शाळा सोडल्याचे कारण परगावी गेला असे नोंदविले आहे. सदरचे रजिस्टर वर शाळेचे मुख्याध्यापक नोंदी करतात व रजिस्टर हे शाळेमध्ये अभिलेखा मध्ये ठेवले जातात. सदरच्या रजिस्टर मधील नोंदी बदलण्याचा कोणालाही अधिकार नाही. सदरच्या रजिस्टर मधील रजिस्टर नंबर ३५१ ही नोंद असलेल्या पानाची पडताळणी केलेली प्रत मी हजर केलेली आहे. आता मला रजिस्टर मधील रजिस्टर नंबर ३५१ नोंद असलेले पान व पडताळणी केलेले पान याची प्रत दाखविण्यात आली ती अस्सल रजिस्टर प्रमाणे खरी व बरोबर आहे. त्यामुळे पडताळणी केलेल्या रजिस्टर चे प्रतिस **नि. ४८** देण्यात येते. आता मला नि. ३/१ वर दाखल केलेला शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र दाखविण्यात आले. सदरचे

प्रमाणपत्र हे म.न.पा.शाळा क्र. १० यानी दिलेले आहे. सदरच्या प्रमाणपत्रावर जनरल रजिस्टर क्र. ३५१ असा नमूद आहे. प्रमाणपत्राचा अनुक्रमांक २०३७८ असा आहे. प्रमाणपत्रावर विद्यार्थ्याचे नाव बाळाबाई विष्णू कांबळे जात हिंदू–महार, जन्म ठिकाण मिरज, जन्म तारीख ०१.०१.१९४६, शाळेत नाव दाखल केल्याची तारीख ३०.०८.१९५२ इयत्ता १ ली ब आणि शाळा सोडलेची तारीख दिनांक ०८.१२.१९५३ इयत्ता १ ली अशी नमूद आहे.तसेच शाळा सोडल्याचे कारण परगावी गेला असे नमूद आहे. तसेच प्रमाणपत्रावर कोणताही प्रकारची खाडाखोड नाही असा शेरा आहे. तसेच प्रमाणपत्रावर शाळेचा शिक्का आहे. प्रमाणपत्रावर मुख्याध्यापक यांची सही व शिक्का आहे. प्रमाण पत्रावर जावक क्रमांक १४९ दिनांक १०.०४.२०२४ अशी नमूद आहे. मुळ जनरल रजिस्टर मधील नोंदीप्रामणे प्रमाणत्रावरील नोंदी या तंतोतंत ख–या व बरोबर आहे. त्यास **आर्टीकल अ** देण्यात येते.

साक्षीदाराचा सरतपास पूर्ण

प्रतिवादी व विधीज्ञांचा पुकारा केला असता गैरहजर प्रतिवादी विरुध्द प्रतिवादी कडून साक्षीदाराचा उलटतपास नाही.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

ANIRUDHA SUNIL RANE Digitally signed by ANIRUDHA SUNIL RANE

मिरज (ए.एस. राणे)

दिनांक ११/१२/२०२५ दिवाणी न्यायालय क. स्तर, मिरज

प्रमाणपत्र

असे प्रमाणित करणेत येते की, सदर साक्षीदाराचा जबाब माझे समक्ष खुल्या न्यायालयात नोंदविला असून त्यातील मजकूर साक्षीदारास वाचुन व समजावुन सांगितला असता त्याने मजकूर खरा व बरोबर असल्याचे मान्य केले.

ANIRUDHA SUNIL RANE Digitally signed by ANIRUDHA SUNIL RANE

मिरज (ए.एस. राणे)

दिनांक ११/१२/२०२५ दिवाणी न्यायालय क. स्तर, मिरज